सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस अधीक्षक कार्यालय**
**स्थानिक गुन्हे शाखा,ठाणे ग्रामीण**
एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग,कोर्ट नाका,खारकर आळी,पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-**400601**,
E-MAIL ID – lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. **022-25343567**

प्रेस नोट क्र. दिनांक :- १६/०५/२०२६

**गणेशपुरी पोलीस ठाणे हद्दीतील क्लिष्ट खुनाचा गुन्ह्याची उकल करण्यात ठाणे ग्रामीण पोलीस पथकास यश फिर्यादी सख्ख्या भाऊच निघाला मुख्य सुत्रधार सुपारी देऊन काढला काटा.**

---------------------------ooooo--------------------------

दि.१२/०५/२०२६ रोजी फिर्यादी नरेश टोलाराम पाटील वय-३७ वर्ष व्यवसाय-नोकरी/रिक्षाचालक रा. शेडगाव पो. दाभाड ता.भिवंडी जि. ठाणे यांनी फिर्याद दिली की,त्यांचा भाऊ परेश टोलाराम पाटील वय-४० वर्ष रा. सदर हा दि.१२/०५/२०२६ रोजी २०:४५ ते २१:०० वा. चे दरम्यान त्याचे युनिकॉर्न मोटार सायकल क्र.एम.एच.०४ जी.एच.९५०३ वरुन राहते घरुन वसई येथे कामावर जात असताना शेडगाव ते शेडगाव फाटा (वाशिंद-अंबाडी रोड) दरम्यान गावतलावाजवळील सिमेंटच्या मोरीजवळ कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कोणत्यातरी हत्याराने अज्ञात कारणावरुन डोक्याचे पाठीमागे व हनुवटीजवळ मारुन गंभीर जखमी करुन जीवे ठार मारल्याबाबत फिर्याद दिल्यावरुन गणेशपुरी पोलीस ठाणे गु.र.क्र.२१८/२०२६ भा.न्या.सं.क. १०३(१) प्रमाणे दि.१३/०५/२०२६ रोजी ०२:४२ वा.वरीलप्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. श्री अनमोल मित्तल, भा.पो.से. अपर पोलीस अधिक्षक तथा स्व. कार्यभार पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी तत्काळ घटनास्थळास भेट देऊन श्री. राहुल झाल्टे उपविभागीय पोलीस अधिकारी गणेशपुरी विभाग यांना गुन्हा उघडकिस आणण्याकामी मार्गदर्शन व सुचना दिल्या त्यानंतर श्री. राहुल झाल्टे उपविभागीय पोलीस अधिकारी गणेशपुरी विभाग यांनी स्थानिक गुन्हे शाखा,ठाणे ग्रामीण तसेच,पोलीस ठाणेकडील विविध पथके तयार करुन गुन्हा उघडकीस आणणेकामी आदेशीत करुन मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे श्री. संदीप गिते, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण व कमलेश बच्छाव पोलीस निरीक्षक,गणेशपुरी पोलीस ठाणे यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कदम, रोहन शेलार,भाऊसाहेब गायकवाड, शरद सुरळकर,उमेश खिरड,मयुर शेवाळे,निरंजन पाटील यांची पथके तयार करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याकरीता त्यांना सुचना देवुन मार्गदर्शन केले.

नमुद पथकाने सदर गुन्ह्याचा तपास करत असताना अथक परीश्रम घेवुन २०० सी.सी.टी.व्ही. कॅमेरे पाहणी केली तसेच, तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करुन गुन्ह्यात आरोपीतांनी गुन्हा करण्याकरता वापरलेले वाहनाचा क्रमांक प्राप्त करुन वरील गुन्ह्यात इसम नामे १) **राकेश भगवान पाटील वय-३७ वर्ष २) प्रेमजीत मधुकर घरत वय-३८ वर्ष ३) दक्षत भानुकांत भोईर वय-२४ वर्ष सर्व रा. विलंगी पो. आगरवाडी केळवा ता. जि.पालघर** यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने कौशल्यपुर्व विचारपुस करता त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली असुन वरील गुन्ह्यात फिर्यादी असलेला मयत याचा सख्खा भाऊ **नरेश टोलाराम पाटील वय-३७ वर्ष व्यवसाय-नोकरी/रिक्षाचालक रा. शेडगाव पो. दाभाड ता.भिवंडी जि. ठाणे** याने मारण्याची सुपारी देऊन भावास जीवे ठार मारण्याचा कट रचला असल्याचे कबुल केल्याने वरील चारही आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास मा. श्री अनमोल मित्तल, भा.पो.से. अपर पोलीस अधिक्षक तथा स्व. कार्यभार पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण मा. श्री. राहुल झाल्टे उपविभागीय पोलीस अधिकारी गणेशपुरी विभाग याचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा,ठाणे ग्रामीणचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.संदीप गिते व गणेशपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री.कमलेश बच्छाव यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक महेश कदम, पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब गायकवाड,पोलीस उपनिरीक्षक रोहन शेलार, स्थानिक गुन्हे शाखा,ठाणे ग्रामीण, पोलीस उपनिरीक्षक मयुर शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक उमेश खिरड गणेशपुरी पोलीस ठाणे, पो. उपनिरीक्षक शरद सुरळकर, पडघा पोलीस ठाणे, पो. उपनिरीक्षक निरंजन पाटील तसेच सफौ/धनाजी कडव, पो.हवा./संतोष सुर्वे, पो.हवा./गोविंद कोळी, पो.हवा./उमेश ठाकरे, पो.हवा/हनुमान गायकर, पो.हवा./संदीप तांडेल, पो.हवा./योगेश शेळकंदे, पो.ना./जितेंद्र वारके, पो.शि./स्वप्नील बोडके, पो.शि./सुरेश धिंदळे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा,ठाणे ग्रामीण, गणेशपुरी पोलीस ठाण्याचे पो.हवा./शेंडे, पो.ना./रणशेवरे, पो.शि./ पादीर, पो.शि./महाजन, पो.शि./डुकले, पडघा पोलीस ठाणेचे पो. हवा./विनोद म्हस्के, पो.शि./योगेश वाघेरे व सायबर विभागाचे पो.हवा./दिपक गायकवाड,पो.हवा./रविंद्र मोरे यांनी उघडकीस आणलेला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक कमलेश बच्छाव गणेशपुरी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

(संदीप गिते)
जनसंपर्क अधिकारी
तथा
पोलीस निरीक्षक,स्थानिक गुन्हे शाखा,ठाणे ग्रामीण.

**********************************************************


महाराष्ट्र पोलीस
BOSS